पुणे महानगरपालिका

महिला व बाल कल्याण समिती

<u>कार्यपत्रिका क्र. १९</u>

**<u>महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १२/१२/२०१८ रोजी दुपारी ३.३० (साडे तीन) वाजता महात्मा ज्योतिबा फुले सभागृह (स्थायी समिती सभागृहात) भरेल.</u>**

**<u>सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.</u>**

<u>मा.सभासदांचे प्रस्ताव</u>

<u>विषय क्र. १११</u>

<u>मा.सौ. अर्चना तुषार पाटील यांचे दिनांक ०४/१२/२०१८ चे पत्र</u>.

पुणे महानगरपालिका प्रभाग क्र.१९ क काशेवाडी मधील मौलाना अबुल कलम आझाद उर्दु बालवाडी येथे प्रभागातील लहान मुले शिकण्यासाठी येत असतात तसेच सदरील परिसरातील लोक याच रस्त्याचा वापर जास्त प्रमाणात ये जा करण्यसाठी करत असतात. तरी सदरील उर्दु बालवाडी समोर असलेली मुतारी हि ये जा करण्याच्या मार्गावर असल्यामुळे तेथील नागरिकांना व वाहनांना जाण्यासाठी सदर मुतारीचा अडथळा होत असल्यामुळे सदरची मुतारी पाहण्यात यावी.

<u>मागील सभेचे विषय</u>

<u>विषय क्र. ११२</u>

सिटी स.नं.११०८/७ फा.प्लॉट नं.४८७,शिरोळेवस्ती गणेशखिंड रोड, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजना मधील महिला व पुरुष सार्वजनिक शौचालय पाडणेस मान्यता देणेबाबत मा. अति. महापालिका आयुक्त (विशेष) यांचेकडील जा.क्र.मआ/ परि २/शिघोक्षेका /६५६, दि.२/११/ २०१८ चे पत्र.

**( सदर विषयाचा पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते . )**

<u>विषय क्र. ११३</u>

शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजने अंतर्गत दंतवैद्यकीय सुविधेबाबत मा.सौ.अर्चना पाटील व सौ.रुपाली धाडवे यांचे दि.९/५/२०१८ च्या पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र.२०,दिनांक २३/५/२०१८ ला अनुसरून मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र.मआ/आरोग्य/६३६, दिनांक २६/१०/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी .

**( सदर विषयाचा पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते . )**

नगरसचिव

पुणे महानगरपालिका